Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५८ वे, अंक १ला, मुंबई । मार्च २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 1, Mumbai I March 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!






देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५८वे, अंक १वा,
मार्च २०२५
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३,
२४३०७५७३
ई-मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in




श्री व सौ जनार्दन कढे मुंबई यांचेकडून मध्यवर्ती मंडळास एक लाख रुपयांची देणगी स्वीकारताना कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, आनंद कुलकर्णी, विजय चाव्हरे



प्रसिद्ध उद्योगपती श्री निलेश दिक्षित DIRECTOR kRENM-KCH) व सौ नेत्रा दिक्षित PROPRIETOR ( CRISPEE BITES (Renmakch India Pvt. Ltd ) यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मध्यवर्ती कार्यालयास भेट.



सोलापूर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने कल्पतरूकार कै. ल. गो. तथा तात्यासाहेब काकडे पत्रकार पुरस्कार मनोज व्हटकर यांना प्रदान करताना प्रमुख पाहुणे चंद्रशेखर टिळक.


MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

**Ravindra Deshpande**

# RASHMI
# ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com

बंधु भगिनींना नमस्कार,

आपल्या सर्वांच्या कृपाआर्शिवादाने संस्थेची उत्तरोउत्तर प्रगती होत आहे हे कळविण्यास मला आणि माझ्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळ सदस्यांना आनंद होत आहे. संस्थेचे कार्य बघून आणि आम्ही पाळत असलेल्या पारदर्शकतेचे फळ म्हणजे आपले सभासद संस्थेला उस्फूर्तपणे देणग्या देत आहेत.

आपल्याला विदीत आहे की, जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकेत वास्तव करत असणाऱ्या प्रो. डॉ. श्रीश देशपांडे यांनी संस्थेला रूपये ३ लाखांची भरघोस देणगी दिली आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये भांडुपस्थित आपले जुने सभासद आणि 'वासल्य ट्रस्ट' या प्रथितयश सामाजिक संस्थेचे खजिनदार श्री. जनार्दन कढे यांनी संस्थेला रूपये १ लाखांची देणगी दिली. या दोन्ही देणगीदारांनी संस्था राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रमासाठी या देणगीवरील व्याजाचा विनियोग करावा अशी इच्छा प्रकट केली आहे. ती पाळण्याचे त्यांना आम्ही आश्वासित केले आहे. अजूनही काही सभासदांनी संस्थेला अर्थसहाय्य करण्याचे आश्वासन दिले आहे. अनेक सभासद संस्थेचे एकूण कार्य बघून समाधान व्यक्त करत आहे व त्यामुळे आमच्या कार्यकारी मंडळाची जबाबदारी वाढली आहे, कारण सभासदांच्या अपेक्षांची पूर्ती करणे हे आम्ही आमचे आद्य कर्तव्य समजतो. यासाठी भविष्यात सुद्धा आपल्या सर्वांचे साहाय्य आणि मार्गदर्शन भक्कमपणे आमच्यासोबत असावे ही आग्रहाची विनंती.

संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभा अत्यंत खेळीमिळीच्या वातावरणात संपन्न होतात आणि विचारांची आदानप्रदान करून संस्थेच्या हिताचे निर्णय तसेच सभासदांसाठीचे कल्याणकारी निर्णय घेतले जातात. मला आनंद वाटतो दि. १८ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये आम्ही नविन उपक्रम राबविला आहे. तो म्हणजे समाजातील काही प्रमुख व्यक्तींना निमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार या सभेस प्रसिद्ध उद्योगपती श्री. श्रीराम कुलकर्णी मुंबई, बारामतीचे राजकीय पुढारी तसेच उद्योजक ॲड. सुधीर पाटसकर आणि नाशिक संस्थेचे अध्यक्ष व मध्यवर्ती मंडळाचे मार्गदर्शक आणि आधारस्तंभ प्रसिद्ध उद्योगपती मुंकुदराव कुलकर्णी आणि आमचे मार्गदर्शक, डोंबिवलीचे जीवन गौरव पुरस्कार विजेते मा. श्री. अरविंदराव हस्तेकर यांनी सभेस उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. या आमच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाला उपस्थित कार्यकारी मंडळ सदस्यांनी दाद दिली आणि पुढील सभांना सुद्धा अशाच प्रसिद्ध ज्ञातीतील व्यक्तींना निमंत्रित करावे असे सूचविले. याचा विचार करून आम्ही दि. १५ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या सभेस सीए श्री. शरदचंद्र झरेगांवकर (प्रसिद्ध हिंदूजा ग्रुपचे संचालक), मा. श्री. संदिप देवरे-सेबीचे जनरल मॅनेजर लिगल. कोल्हापूरचे ॲड. शिवराम जोशी यांना आमंत्रित केले आहेत. कार्यकारी मंडळ सदस्यां व्यतिरीक्त सर्व सामान्य सदस्यांच्या आणि ज्ञातीतील प्रथितयश व्यक्तींच्या सल्ल्यानुसार आम्ही यापुढे वाटचाल करणार आहोत. ज्ञातीतील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना अधिकाअधिक मदत करणे सुरू ठेवण्याचे अभिवचन आम्ही संस्थेचे पदाधिकारी देत आहोत.

कळविण्यास आनंद वाटतो की आम्हांला बी. बी. एन ग्लोबलच्या संभाजीनगर येथील परिषदेमध्ये भेटलेले तरूण उद्योजक श्री. निलेश दिक्षित मॅनेजिंग डायरेक्टर रेनमॅक ज्यांच्या व्यवसायची आर्थिक उलाढाल रू. २.५० हजार कोटींच्यावर आहे व ज्यांची कंपनी लोकल रेल्वे आणि मेट्रो रेल्वेसाठी आधुनिक यंत्र सामग्री पुरविते ते व त्यांच्या सुविद्य पत्नी व प्रसिद्ध उद्योजिका आणि राधा फूडस् या कंपनीच्या मालकीण सौ. नेत्रा दिक्षित यांनी संस्थेच्या कार्यालयास भेट देऊन संस्था करीत असलेल्या कार्याचे कौतुक केले. आमच्या सर्वांचा प्रयत्न असतो की, आपल्या ज्ञातीतील जास्तीत जास्त उद्योजकांनी आणि प्रसिद्ध व्यावसायिकांनी, शिक्षण आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींनी आपल्या संस्थाना भेट देऊन मार्गदर्शन करावे.

सर्व संलग्न संस्थाना विनंती आहे की, त्यांनी उद्योजकांची शिबिरे तसेच समाज उपयोगी शिबिरे उदा. वैद्यकीय

आरोग्य चिकित्सा शिबिरे, रक्तदान शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन यासारखे उपक्रम राबवून आपल्या ज्ञातीतील सदस्यांची सेवा करावी. सध्या बिकट होत चालेल्या विवाह समस्येवर मध्यवर्ती मंडळाने मात करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी एक अल्प सेवा म्हणून ज्ञातीतील उपवर मुला-मुलींची नावे संग्रहित करून त्यांना समाचारामध्ये प्रसिद्धी दिली जाते. यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

सर्व सभासदांसाठी ऐच्छिककरीत्या सामूहिक आरोग्यविमा राबवण्याचे संस्थेने ठरविले असून त्यासाठी सर्व सभासदांची त्यांच्या जन्मतारखेनुसार अद्यावत माहिती संग्रहित करण्याचे काम लवकरच पूर्ण होईल. हे सर्व काम कल्याण संस्थेचे पदाधिकारी श्री. रमेश पालकर आणि श्री. जंयत देशमुख यांनी केले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करून आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आपण सर्वांनी आवश्यक असलेली माहिती लवकरात लवकर पूरवावी जेणेकरून आपल्या योजनेचा प्रस्ताव प्रथितयश आरोग्यविमा कंपन्याकंडून मंजूर करून घेता येईल. आम्हांला अशा योजना राबविण्यासाठी सहकार्याची आणि आपल्याकंडून जास्तीत जास्त सभासद वृद्धी व्हावी ही अपेक्षा आहे.

दि. १६ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिन आपल्या संस्थेचा सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. त्यांची जबाबदारी संस्थेच्या कार्यवाह सौ. रोहिणी तडवळकर, सौ. ज्योती जोशी, सौ.सुनिता रोझेकर, सौ. केतकी कुलकर्णी, सौ. माधवी मोगरकर, ॲड. मंजिरी पारसनीस यांनी घेतली आहे. महिला दिनानिमित्त सर्व महिला वर्गाला शुभेच्छा!

**प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

# दासनवमी महोत्सव

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

## श्रीसमर्थांची उत्सव संकल्पना

श्रीसमर्थांनी पहिला रामनवमी उत्सव हा मसूरच्या मारूतीसमोर सुरू केला. हा उत्सव चाफळचे श्रीराममंदिर बांधायच्या आधी सुरू केला होता. या पाठिमागे एक महत्त्वाचे कारण होते, ते म्हणजे हिंदुना एकत्र आणणे. मसूर हे शाहाजी महाराजांच्या जाहागिरीत समाविष्ट होते. मुख्य केंद्र होते. यवनांचे अतिक्रमण प्रचंड होते. मुसलमानांची संख्या मसूरमध्ये खूप होती. हिंदूंचे जबरदस्तीने धर्मांतरण होत होते. शहाजीराजे बंगळूर मध्ये असायचे व त्यांना या गोष्टीची चिंता होती. अशा सामाजीक भयग्रस्त वातावरणात श्रीसमर्थ श्रीरामाचा उत्सव सुरू करतात, प्रतिकुल अशा परिस्थितीत तेथील भक्तांचे संघटन करतात ही साधी सोपी गोष्ट नव्हती.

एकूणच श्रीसमर्थांची उत्सव संकल्पना ही व्यापकतेने बघण्याची गरज तेव्हा आणि आत्ताही आहे. ठिकठिकाणी मारूती मंदिरे व मठस्थापना केली ती यासाठीच, की लोकांचे संघटन करून हिंदवी स्वराज्याला अनुकूल वातावरण आणि मानसीकता तयार करणे. देवाचे वैभव वाढवावे हा तर मुख्य उद्देश होताच, त्याचबरेबर विविध प्रकारच्या सेवा वेगवेगळ्या प्रांतातून आलेल्या, वेगवेगळ्या जाती, प्रजाती सर्वांकडून करवून घेणे. सर्वांना एकत्र आणण्यासाठी देवाचा उत्सव हे सर्वमान्य कार्य होते. प्रत्येकाला सेवेचा आनंद मिळावा, श्रमदानाचे समाधान मिळावे, देव, देश, धर्मांसाठी काहीतरी करण्याचा मानस तयार व्हावा अशी प्रेरक ईच्छा श्रीसमर्थांची होती. श्री क्षेत्र चाफळला

श्रीसमर्थांनी श्रमदानातून श्रीराममंदिर उभारले. रामनवमीचा उत्सव नऊ दिवस सुरू केला. छत्रपती शिवरायांकडून उत्सवासाठी शिधा व अन्य सुविधा पुरवण्यात येत असत. मोठी रथयात्रा निघत असे.

श्रीसमर्थ स्वत: रात्री मंदिर झाडून स्वच्छ करण्याची सेवा करत. उत्सवात दैनंदिन वेगवेळ्या सेवा देणाऱ्यांना मानाचे विडे देण्याची परंपरा सुरू केली. काकड आरती पासून ते छबीना, मोरचेल, पंखा, रांगोळी अब्दागीरी पालखी, कीर्तन – कथा करणारे, शेणगोळा सारवणारे, आचारी, प्रसाद अशा सर्वांनी दरवर्षी उत्सवात येऊन आपापली सेवा श्रीरामचरणी अर्पण करावी हाच हेतू या मानाच्या पाठिमागे होता व आहे. ज्या काळात मंदिरे पाडली जात होती त्या काळाात श्रीसमर्थ रामनवमीच्या उत्सवाच्या माध्यमातून शेकडो लोंकाचे संघटन करत होते. 'उपासनेचे' उत्तिर्ण व्हावे। भक्तजन वाढवावे। हाच शुद्ध हेतू होता.

याच रामनवमीच्या धरतीवर श्रीसमर्थांच्या निर्याणानंतर शिष्य व भक्त मंडळींनी दासनवमी उत्सव सुरू झाला. माघ वद्य प्रतिपदा ते माघ वद्य नवमी असा हा उत्सव संपन्न होतो. श्रीसमर्थांच्या विविध मठांमध्ये हा दास नवमी उत्सव या काळात साजरा केला जातो.

हीच उत्सव परंपरा श्रीक्षेत्र खातगावच्या श्रीसमर्थ रामदासस्वामी मठात गेली एक तप(१२वर्षे) साजरी केली जाते. समर्थ भक्त मोहनबुवा रामदासी यांनी स्थापना केलेल्या या मठात हा उत्सव सप्तमी त नवमी असा साजरा केला जातो. खातगाव हे कर्जत तालुका, अहिल्यानगर या ठिकाणी असलेले एक छोटेसे गाव आहे. या पंचक्रोशीत श्रीसमर्थांचे वैभव वाढवणे, श्रीसमर्थ विचारांचा प्रचार प्रसार करणे सामाजिक उपक्रम उदा. कुपोषणमुक्ती, देशी गोसेवा, वेदपाठशाळा, मोफत आरोग्यशिबीर असे उपक्रम राबवले जातात, हे या मठाचे विशेषत्व आहे.

यावर्षी २०२५ चा दासनवमी उत्सव दिनांक १८फेब्रुवारी ते २३फेब्रुवारी असा संपन्न झाला. १८तारखेला श्रीराम, श्रीसमर्थ यांच्या मुर्तीला उदवार्चन विधी संपन्न झाला. विविध द्रव्यांनी स्नान घातले गेले. १९तारखेला उत्सवाची मुहूर्तमेढ, धर्मध्वज स्थापन करून त्याची विधिवत पूजा स.भ.मोहनबुवांच्या हस्ते संपन्न झाली. यानंतर कोठीपूजन म्हणजे दासनवमी उत्सव हा भिक्षेतून आलेल्या अन्नधान्यावरच संपन्न होत असतो. उत्सवात आलेले भिक्षेचे धान्य जेथे ठेवले जाते त्या कोठीघराची म्हणजेच अन्नपूर्णामातेचीच पूजा केली जाते. पहाटे काकड आरती, नंतर सर्व देवदेवतांचे अर्चन, पूजन, अभिषेक शोडस उपचाराने संपन्न झाले. रोज नित्यनियमाने श्रीसमर्थांची पालखी म्हणजेच छबीना मंदिराला प्रदक्षिणा घालून मग हनुमंताच्या दर्शनासाठी थांबतो. श्रीसमर्थांचे सद्गुरू आराध्य श्रीरामचंद्र आणि आदर्श श्रीहनुमंत होते. ''दासाची संपत्ती रामसितापती । जिवाचा सांगाती राम ऐक।।'' हे जसे मारूतीरायांचे चरित्र आहे तसेच श्रीसंमर्थाचेही आहे. मारूतीराय हे दास्य भक्तीचे आदर्श आहेत म्हणून ते श्रीसमर्थाचेही आराध्य आहेत, साहाय्यक आहेत. या अर्थानेही रोज मारूतीरायांची भेट, दर्शन घेतात, असा भाव आहे. उत्सवात रोज छबीना झाला की मंदिराला १३प्रदक्षिणा सर्व भक्तांचा समुदाय व रामदासी मंडळी मिळून घालतात. यावेळी १३ देवदेवतांच्या समर्थ रचित आरत्या विशिष्ठ चालीत व ठेक्यात आळवल्या जातात. हा सोहळा अत्यंत भावपूर्ण व अनुभवण्यासारखा असतो. सर्व समर्थभक्तांची ब्रह्मानदी टाळी लागते. रोज सायंकालीन उपासना, करूणाष्टके, सवाया, आरत्या होतात, सांप्रायिक भजनाचा विशेष कार्यक्रम नित्य श्रीसमर्थांसमोर गायला जातो. नित्य रात्री रामदासी सांप्रदायिक कीर्तनकारांची कीर्तने होतात. ह.भ.प. श्रीरामनुवा रामदासी यांना खातगाव मठात कीर्तनाचा मान आहे. अत्यंत मधूर वाणी, अभ्यासपूर्ण अशा विषयांवर भक्तिभावपूर्ण कीर्तने साजरी झाली.

यावर्षीच्या उत्सवाचे विशेष म्हणजे मठाच्या तपपुर्ती सोहळ्या निमित्ताने करविरपिठाचे शंकराचार्य प.पू.विद्यानृसिंह भारती यांचे आगमन व स्वागत १३तारखेला सायंकाळी वाद्यांच्या गजरात मिरवणूकीने मठात झाले. हिंदू धर्माचे सर्वोच्च पद असणारे शंकराचार्य यांच्या आशिर्वादाने हा उत्सव विशेष महत्त्व पावला. २०तारखेला सकाळी आचार्यांच्या चरणपादुकांचे विधीवत पूजन झाले. यानंतर खातगाव मठातर्फे दिला जाणारा

पुरस्कार श्री. राकेश धावटे पाटील सर (कोर हेरिटेज संस्था) यांना त्यांच्या कार्याबद्दल दिला गेला. शंकराचार्यांच्या हस्ते दिला गेला. यानंतर शंकराचार्यांचे आशिर्वचन झाले. ते म्हणाले मी सुद्धा तुमच्यासारखाच एक सेवक आहे. तुम्ही जसे समर्थांचे सेवक तसा मी सुद्धा आद्य शंकराचार्यांचा एक सेवक आहे. 'नामस्मरण' या शब्दाची उकल आचार्यांनी छान समजावून सांगितली ज्याचा आपण आधी अनुभव घेतला आहे त्याचेच स्मरण करतो किंवा होते. मग देवाचा नामाचा अनुभव आधी न घेताच कसे स्मरण होईल? तेव्हा हा शब्द उलटा पाहिजे. स्मरण पूर्वक नाम असे पाहिजे. आधी स्मरण करावे व मग नाम घ्यावे असे श्रीसमर्थही नामस्मरण भक्तिच्या समासात सांगतात. ''स्मरण देवाचे करावे । अखंड नाम जपत जावे ।''

यानंतर आचार्यांच्या हस्ते नियोजीत श्रीराममंदिराच्या चौथऱ्याचे पूजन व विट बसवली. मठाच्या अन्य विकासकामांसाठी आचार्यांचे आशिर्वाद मिळणे हा अंत्यत मंगल व शुभसंकेत आहे. तप:पुर्तीचे हे फळच आहे.

दासनवमी उत्सवात मोफत आरोग्यशिबीर सेवा पार पडली. २२तारखेला स.भ.मोहनबुवांनी दुपारी १२वाजता श्रीसमर्थांची निर्याण कथा कथन केली. भक्तगणांचा मोठा समुदाय उपस्थित होता. सर्वांना ही कथा ऐकता श्रीसमर्थांचे निर्याण डोळ्यासमोर उभे राहून अश्रू अनावर होतात. अत्यंत ह्रदय असा हा प्रसंग असतो. संपूर्ण जिवनभर श्रीसमर्थांनी रामाचा व रामकार्याचा ध्यास घेतला होता. रामाची आज्ञा म्हणून धर्म स्थापनेचा हव्यास केला. त्याला आवश्यक तेवढे राजकारण साधना म्हणून केले. परंतु 'मुख्य ते हरिकथा निरूपण।' हेच शेवटपर्यंत आपल्या चरित्रातून दाखवून गेले. माघ वद्य नवमी, दुपारी १२वा. रघुकुळटिळकांचा वेध सन्निध आला। तदुपरी भजनासी पाहिजे सांग केला। 'हे अंतिम मनोरथ पूर्ण झाले. राम आणि दास दोघे पहुडले रामी।' श्रीसमर्थांनी शेवटी शिष्यांना आश्वस्त केले. 'माझी कथा आणि वाणी। गेली म्हणाल अंत:करणी। परी मी आहे जगज्जीवनी। निरंतर। आत्माराम दासबोध माझे स्वरूप स्वत: सिद्ध। असता न करावा खेद। भक्तजनी।।' असे सांगून गेले. श्रीसमर्थांचे स्वत: सिद्ध स्वरूप असणाऱ्या ग्रंथराज दासबोधाचे पारायण भगीनीवर्गाने सामुदायिकरित्या या पाच दिवसात मठात संपन्न केले. आरती व प्रसाद वाटपाने सांगता झाली.

शेवटी २३तारखेला माघ वद्य १०या दिवशी लळीताचे कीर्तन व गुलालाचा कार्यक्रम जल्लोषात पार पडला. सर्व कार्यकर्ते, सेवक यांचा सत्कार हेच लळीताचे मुख्य सुत्र आहे. प्रभु रामचंद्र सिंहासनी आरूढ झाल्यावर सर्व वानर आणि सेवक यांचा सत्कार त्यांना भेटवस्तू प्रदान करून करतात. हनुमंताच्या दास्यभक्तीपुढे मात्र स्वामीरामचंद्र त्याला स्वत:लाच देऊन टाकतात. रामी रामदासा निज भेटी झाली। प्रभु दासाला आलिगंन देतात. असा महान पवित्र भाव या लळिताच्या मागे आहे. म्हणून गुलाल उधळतात. प्रभु तथास्तु म्हणतात.

शेकडो भक्तांनी, सेवकांनी महाप्रसाद सेवन केला. ग्रामस्थांनीही भंडाऱ्याचा लाभ घेतला. अशा रितीने या दासनवमी उत्सवाची सांगता झाली. सर्व सेवेकरी, कार्यकर्ते यांच्या परिश्रमाने, सेवेने श्रीसमर्थ तृप्त झाले व त्यांनी सर्वांचे कल्याण मागितले.

रघुनाथ दासा कल्याण व्हावे। अतिसौख्य व्हावे। आनंदवावे। उद्वेग नासो वरशत्रू नासो। नाना विळासे मग तो विळासो।।१।।

**हिंदू नूतनवर्षाच्या - गुढीपाडव्याच्या**
**सर्व ज्ञाती बांधव-भगिनींना, सभासदांना, देणगीदार, जाहिरातदारांना**
**हार्दिक शुभेच्छा!**

# संलग्न संस्था वृत्त

**मुंबई :** मध्यवर्ती मंडळास एक लाख रूपयांची देणगी. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्रा२ण मध्यवर्ती मंडळास मुंबई स्थित श्री. जनार्दन कढे यांनी दि. ०१/०३/२०२५ रोजी रूपये एक लाखाची देणगी दिली आहे. श्री व सौ कढे यांनी मध्यवर्ती मंडळाच्या मुंबईतील लक्ष्मीनारायण बागेतील मध्यवर्ती कार्यालयास भेट दिली. मध्यवर्ती संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी तसेच कार्यवाह श्री. आनंद कुलकर्णी आणि सदस्य श्री. विजय चाव्हरे हे प्रसंगी उपस्थित होते. श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या कार्याची माहिती दिली. श्री. कढे यांनी सदर देणगीचा विनियोग ज्ञातीतील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणीक कार्यासाठी, मदतीसाठी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. श्री. कढे सामाजीक कार्यात अग्रेसर असून मुंबईतील 'वात्सल्य ट्रस्ट' या सामाजीक संस्थेचे खजिनदार म्हणून काम पाहत आहेत. मध्यवर्ती मंडळास दिलेल्या देणगीबद्दल आभार व्यक्त करण्यात येत आहे.

**सोलापूर :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था महिला शाखेचा हळदी-कूंकू व तिळगुळ समारंभ. संत साहित्यिक, प्राचार्य डॉ. नसीमा पठाण यांचे मार्गदर्शन - मकर संक्रांतीचे औचित्य साधून येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या महिला शाखेच्या वतीने संस्था कार्यालय समर्थ संकुल दत्तचौक येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व महिला शाखेच्या अध्यक्षा कु. हेमाताई चिंचोळकर यांच्या अध्यक्षतेखाली हळदी कूंकू व तिळगुळ समारंभ अतिशय उत्साही वातावरणात पार पडला. तर यावेळी संत साहित्यिक, प्राचार्य डॉ. नसीमा पठाण यांचे संक्रांती सणांचे महत्त्व या विषयावर व्याख्यान केले.आपल्या या व्याख्यानात डॉ. नसीमा पठाण यांनी संत साहित्याचा संदर्भ देऊन संक्रांती सणाचे महत्त्व विशद केले. संत रामदास


**JV MARKETING & INVESTMENTS**

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*

*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*

*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

स्वामी यांनी रचलेले मनाचे श्लोक मानवी मनाला मार्गदर्शन करतात. मनाच्या श्लोकाप्रमाणे चांगले बोलावे, चांगले वागावे, बोलताना शब्दांमध्ये गोडवा असावा हेही एक संक्रमण आहे. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी डॉ. पठाण यांनी एक बहारदार कविता सादर केली. डॉ. येळेगावकर यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेमध्ये होणाऱ्या आगामी उपक्रमाची माहिती दिली. महिला शाखेच्या अध्यक्ष कु. हेमाताई चिंचोळकर यांनी सर्व समाजाच्या महिलांसाठी विविध उपक्रम राबवले जातात असे आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रारंभी समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तदनंतर प्रा. सौ. मधुरा वडापुरकर सौ. स्मिता देशपांडे यांच्या गीत गायनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी उपस्थित महिला भगिनींना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्राचार्या डॉ. नसीमा पठाण यांच्या हस्ते हळदी-कूंकू तिळगुळ देवन संक्रांतीचे वाण (भेटवस्तू) देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्यवाह डॉ. सौ.नभा काकडे यांनी केले. सौ. क्षितिजा गाताडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन प्रा सौ. शुभदा कुलकर्णी यांनी केले.

**विलेपार्ले** : दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण संघ, विलेपार्ले येथे गाण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. कोल्हापूर येथून स्वर सांगाती हा वाद्यवृंद आला होता. अभंग, भक्तीगीत, गवळण, नाट्यगीत,भावगीत,लावणी अशा प्रकारच्या गायनाने कलाकारांनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सर्व कलाकारांचे पार्लेकरांनी भरभरून कौतुक केले. तसेच दुसऱ्या दिवशी सकाळी सहस्त्रावर्तन ठेवले होते. त्याला देखील अनेक भक्तगणांनी उपस्थिती लावली होती. त्यानंतर भजनी मंडळाने येऊन भक्तिगीते आणि भजने सादर केली आणि त्यानंतर दुपारी श्रींच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

✲ धावण्याचा ध्यास : विलेपार्ल्यातील, चार्टर्ड अकाऊंटंट, श्री. माधव जोशी यांनी वयाच्या ६२व्या वर्षी टाटा मुंबई मॅरॅथॉनची फुल मॅरेथॉन(४२.१९५ किमी) ४.५९ तास या वेळेत पूर्ण केली. ही त्यांची ९ वी मुंबई फुल मॅरेथॉन होती. त्यांची आत्तापर्यंतची धावण्याची कहाणी प्रेरणादायी आहे. त्यांनी २०११ साली धावण्याच्या शर्यतीत भाग घेण्यास सुरवात केली. २०१२ साली त्यांनी प्रथमच मुंबई हाफ मॅरेथॉन पूर्ण केली. त्यानंतर सातारा, हैद्राबाद, कोल्हापूर, पुणे, दिल्ली, पणजी तसेच पॅरीस व भूतान येथील वेगवेगळ्या अंतराच्या मॅरेथॉन्स पूर्ण केल्या. जानेवारी २०२३ ची मुंबई मॅरेथॉन पूर्ण केल्यावर त्या वेळेच्या आधारावर त्यांनी जून मध्ये होणार्या दक्षिण अफ्रिकेतील कॉमरेड्स ह्या स्पर्धेसाठी नोंदणी केली. ही ९० किमी ची स्पर्धा असून ती १२ तासात पूर्ण करायची असते. त्यासाठी लागणारा खडतर सराव त्यांनी सुरू केला. एवढी मोठी स्पर्धा व साठीपुढील वय यामुळे त्यांनी व ग्रुपमधील इतर स्पर्धकांनी देखील पूर्ण मेडीकल चेक-अप करावा असे ग्रूपमधील डॉक्टरांनी सुचविले. त्यानुसार H N Reliance Hospital येथे सगळ्या टेस्ट केल्या. त्यावेळी तेथील डॉ.ना माधव जोशींच्या Stress test व ECG मधे काही फरक जाणवले. त्यानुसार तेथील डॉ.नी पुढील टेस्ट करायला सांगितल्या. सर्व टेस्ट (अँजीयोग्राफी वगैरे) झाल्यावर ३ मोठी ब्लॉकेजेस असल्याने बायपास सर्जरी करावी असे सांगितले. इतरही काही डाँ.ची मते घेतली पण सर्वांची मते सर्जरी करावी अशीच होती. त्यानुसार डॉ. विचारे यांनी ९ मे २०२३ रोजी जसलोक हॉस्पिटल येथे सर्जरी केली. इतर सर्व रिपोर्ट नॉर्मल असल्याने रिकव्हरी लवकर होईल असे डॉ.चे मत होते. त्यंनीही असा विश्वास दिला होता की तुम्ही परत धावू शकाल. त्यामुळे माधव जोशींची ऊमेद आणखीन वाढली. सर्जरीनंतर २ महिने योग्य आहार/ नियमीत नेमून दिलेला व्यायाम व औषधे यामुळे त्यांनी परत टॉप गीयर एम् आय जी या त्यांच्या ग्रूपबरोबर धावण्यास सुरवात केली. मार्च २०२४ मध्ये त्यांनी भुतान येथे हाफ मॅरेथॉन (२१.१ किमी) थंड व डोंगराळ भागात पूर्ण केली. त्यानंतरही त्यांनी ३/४ अर्ध मॅरेथॉन पूर्ण केल्या. नियमीत व्यायाम / आहार/ सराव व औषधे ही चतुःसूत्री सुरूच होती. आता लक्ष्य होते मुंबई मॅरेथॉन ही फुल मॅरेथॉन (४२.१९५ किमी) पूर्ण करण्याचे. ४.३० तासात पूर्ण करण्याचे टार्गेट बदलून शर्यत फक्त पूर्ण करण्याचे ठरविले त्यानुसार ४तास ५९ मिनीटे या वेळेत शर्यत

पूर्ण केली. श्री माधव जोशींनी असेच नवनवीन मैलांचे दगड पार करावेत व अनेकांचे प्रेरणस्रोत बनावे ही सदिच्छा. त्यांना भावी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा !!

**सोलापूर :** संरक्षण विषयक वस्तूंची निर्यात करण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद असल्याने जगाचे लक्ष वेधण्यात भारत यशस्वी ठरला आहे. त्यामुळे २०२५ नंतर भारताच्या आर्थिक प्रगतीचा काळ असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांनी गुरुवारी (ता.१३) सोलापूर येथील कार्यक्रमात केले. येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने कल्पतरूकार कै. ल. गो. तथा तात्यासाहेब काकडे पत्रकार पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून श्री. टिळक भारतीय अर्थव्यवस्था २०२५ व नंतर या विषयावर बोलत होते. संस्थेतर्फे यंदा हा पुरस्कार दैनिक दिव्य मराठीचे वरिष्ठ बातमीदार मनोज व्हटकर यांना श्री. टिळक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, पाच हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकरउपाध्यक्ष विजय कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, कार्यवाह श्याम जोशी, खजिनदार सतीश पाटील, सहकार्यवाह डॉ.नभा काकडे, कार्यकारिणी सदस्य शंकरराव कुलकर्णी, रंगनाथ जोशी, रविंद्र तुळजापूरकर, महिला अध्यक्ष हेमा चिंचोळकर, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी आदीसह समाजातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व लेखक अरविंद जोशी होते. यावेळी टिळक पुढे म्हणाले, राजकारण आणि अर्थकारण पूर्णपणे वेगळे आहे. भारताने १९४७ ते १९८० पर्यंत कृषीप्रधान, १९८० ते १९९१ उद्योगप्रधान तर १९९१ नंतर सेवाप्रधान क्षेत्रात आर्थिक सुधारणा घडवत प्रगती साधल्याचे दिसते. जगाच्या पाठीवर मोठी अर्थव्यवस्था होण्यासाठी विविध उत्पादनांची निर्यात महत्त्वाची आहे. अर्थमंत्री सीतारामन यांनी २०२० च्या अर्थसंकल्पात भारत ७५ टक्के संरक्षण विषयक वस्तूंची निर्मिती भारतातच करेल असे सांगितले होते. तर यंदाच्या अर्थसंकल्पातील तरतूदीवरुन संरक्षणमंत्र्यांनी भारत ६२ हजार कोटी रूपयांच्या संरक्षणविषयक वस्तूंची निर्यात करेल असे म्हटले आहे. त्यामुळे २०२५ नंतरचा काळ हा भारताच्या आर्थिक प्रगतीचा काळ असणार आहे. त्यासाठी लागणारे नियोजन हे तितकेच पक्के करताना यंदाच्या अर्थसंकल्पात एआय प्रणालीवर विशेष भर दिला




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH

B.COM. CAIIB DBM

Insurance & Investment Consultant

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance Specialist

आहे. देशाला सशक्त व महासत्ताक बनवण्यासाठी हे पाऊल विशेष महत्त्वाचे ठरणार आहे असेही श्री.टिळक म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. जोशी यांचे समारोपाचे भाषण झाले. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये यांनी आभार मानले.

वडोदरा : दिनांक १९/१/२०२५, रविवार रोजी सायंकाळी ५ ते ७ दरम्यान महारुद्र हनुमान संस्थान वाडी, वडोदरा येथे वडोदरा संस्थेचा हळदी कुंकू आणि तिळगूळ समारंभ मोठ्या थाटात साजरा झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सौ. कुंदाताई पुरंदरे यांनी उपस्थित सभासदांचे मनापासून अभिनंदन आणि स्वागत केले. तसेच मकरसंक्रांतीचा सण आणि त्याचे महत्त्व आणि हळदी कुंकू आणि त्याचे महाराष्ट्रीयन समाजात असलेले कौटुंबिक आणि सांस्कृतिक महत्त्व या विषयी सखोल माहिती दिली. संस्थेच्या वाढदिवस उपक्रमा हेठळ सभासद श्री मनीष गुरूजी यांचा विश्वस्त, अध्यक्ष आणि कार्यवाह ह्यांचा हस्ते बुके आणि कार्ड देऊन सत्कार करण्यात आला. सौ. स्वाती ठोसर यांच्या भक्ती गीताने सुरवात झाली. त्यानंतर कार्यवाह श्री नितीन शहापूरकरांनी संस्थेची एप्रिल ते डिसेंबर २०२४ ह्या दरम्यान झालेल्या सभासदांच्या संख्येत वाढ तसेच सभासदांकडून आलेल्या देणगीचा लेखा जोखा प्रस्तूत केला. वडोदराचे प्रसिद्ध मोटीव्हेशनल स्पीकर श्री केदार तेलंग यांना ह्या कार्यक्रमात विशेष आमंत्रित करण्यात आले होते. पहिले त्यांचा बुके देऊन अध्यक्षांच्या हस्ते सत्कार झाला आणि त्यांचा परीचय श्री प्रताप रांजणगावकर यांनी दिला. त्यानंतर श्री केदार यांनी सतत एक तास सभासदांना मोटीव्हेट केलं हेप्पी लाईफ या विषयावर त्यांनी सभासदां कडून प्रश्न आमंत्रित करून त्यांना समाधानकारक उत्तरे दिली. मंडळाचे जेष्ठ सभासद श्री अजय पौंड्रीक यानी या प्रसंगी त्यांनी लिहिलेल्या संगीतकार बेलडी श्री लक्ष्मीकांत - प्यारेलाल ह्यांचा संगीत प्रवास विषयावर पुस्तकाविषयी माहिती दिली. विश्वस्त आणि अध्यक्षांच्या हस्ते उपस्थित सभासदांना तिळगूळ आणि गुलाबाचे फुल देण्यात आले. महिला सभासदांना उपाध्यक्ष रोहिणी ताई बक्षी, सहकार्यवाह सौ. स्वाती सुरतकर, सौ. अंजली सुरतकर, सौ. स्वाती नितीन शहापूरकर, सौ. सुनीती भट्ट भट्ट, सौ. स्वाती ठोसर, सौ. कुंदाताई पुरंदरे, सौ. रामतीर्थ, सौ. उषाताई शरद माळपांडे आणि इतर महिला कार्यकारिणी यांच्या हस्ते हळदी कुंकू, गजरा आणि आवा देण्यात आला. ह्यावेळी विशेष करून तरूण सभासदांची उपस्थितीही नजरेत भरत होती. श्री अनुज बक्षी, श्री नितेश कुलकर्णी आणि सौ. हेमांगीनी नितेश कुलकर्णी यांनीही उत्साहाने भाग घेतला. अनेक सभासदांनी भरघोस प्रासंगिक देणगी देऊन आपला आनंद व्यक्त केला.

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे दास नवमी निमित्त दासबोध पारायण गुरुवार दिनांक १३-२-२५ ते शनिवार दिनांक २२-२-२५पर्यंत आयोजित करण्यात आले होते. गुरुवार दिनांक १३-२-२५ रोजी सकाळी दहा वाजता दासबोध ग्रंथ पूजन त्यानिमित्त पंचोपचार पूजा संस्थेचे सहकार्यवाह श्री. प्रकाश लोणकर यांच्या हस्ते संपन्न झाली. रोज दुपारी अडीच ते पाच या कालावधीत पारायण होत असे.अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला ३०-३५ साधक सहभागी झाले होते. रोज वाचन झाल्यानंतर आरती करून प्रसाद वाटप होत असे. पारायण दरम्यान प्राथमिक शाळेतील(पहिली ते चौथी) विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा मंगळवार दिनांक १८-२-२५ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. गट पहिला (१ली - २री ) कथाकथन - संत रामदास स्वामींची कथा मुलांनी काही सुंदर कथा प्रस्तुत केल्या. गट दुसरा (३री - ४थी) उतारा वाचन - अहिल्याबाई होळकर बालपण. उतारा संस्थेकडून देण्यात आला होता. अहिल्याबाई होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्ष असल्यामुळे या विषयाची निवड केली होती. मुलांनी खूप छान उतारा वाचन केले. बक्षीस वितरण समारंभ लगेचच करण्यात आला.संस्थेचे अध्यक्ष श्री अशोक जहागिरदार व कार्याध्यक्ष श्री भगवान आडगावकर यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. सर्व मुलांना वही व खाऊ वाटप करण्यात आले.परीक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुलांनी गोष्ट कशी सांगावी,उतारा वाचन करताना उच्चार कसे हवेत याबद्दल मार्गदर्शन केले. महिला शाखाध्यक्ष डॉ.सौ.प्रेरणा क्षीरसागर यांनी मुलांना सुंदर 'रंगाचे

गाणे'सांगितले. मुलांनी व पालकांनी गाणे खूप आवडले असे आवर्जून सांगितले. महिला शाखा कार्यकारणी सदस्य, कार्यकारणी सदस्य व विश्वस्त यांच्या एकजुटीने स्पर्धा अतिशय उत्तम झाल्या. शनिवार दिनांक २२-२-२५ दास नवमी - सौ अरुणा अग्निहोत्री यांचे 'समर्थ रामदास स्वामी' यांच्या वरील निरूपण आयोजित केले होते. सौ. अरुणा अग्निहोत्री यांनी समर्थांचे बालपण, नाशिक येथे केलेली श्रीरामाची उपासना, भारतभर केलेले देशाटन, संघटन अशा विविध पैलू वर अभ्यास पूर्ण रसाळ निरूपण केले. छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ या गुरु शिष्या बद्दल अतिशय सुंदरपणे विवेचन केले. श्रीलंकेत स्थापन केलेले मारुती मंदिर, मठाधिपती म्हणून महिलांना दिलेला सन्मान याही पैलू वर अभ्यासपूर्ण निरूपण केले दास नवमीच्या दिवशी ५०-५५ साधक निरुपण ऐकण्यासाठी उपस्थित होते .शेवटी आरती करून प्रसाद वाटप करण्यात आले.

**धुळे :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे तर्फे समर्थ रामदास नवमी निमित्ताने सुपरिचित किर्तनकार हभप श्री संजिव कुलकर्णी यांचे श्री समर्थांचा धन्य तो संसारी या विषयावर प्रवचन काल सायंकाळी नवग्रहीतील रामभाऊ गरुड मंगल कार्यालय (त्रिविक्रम मंदिर संस्थान) येथे आयोजित करण्यात आले होते. नारायण बोवा समाधी मंदिराचे मठाधिपती श्री भाऊ महाराज रुद्र, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे चे अध्यक्ष सी ए राजाराम कुलकर्णी प्रमुख अतिथी होते. प्रारंभी समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करुन माल्यार्पण करण्यात आले. अध्यक्ष सीए राजाराम कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची संकल्पना मांडली व देऋब्रा संघाच्या सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर केला. चंद्रशेखर पुरोहित यांनी सूत्रसंचालन केले व प्रमुख अतिथींचा परिचय करुन दिला. मा भाऊ महाराज रुद्र व राजाराम कुलकर्णी यांनी हभप श्री संजिव कुलकर्णी यांचा औपचारिक सत्कार केला. हभप श्री संजिव प्रभाकर कुलकर्णी यांनी आपल्या प्रवचनातून समर्थांना अभिप्रेत हरी भक्तीत लीन असणाऱ्या संसारी माणसांविषयी विस्तृत विवेचन केले तसेच समर्थांनी केलेले धर्म प्रसाराचे व मंदिर निर्मितीचे कार्य यावर प्रकाश झोत टाकला तसेच दासबोधातील अनेक संदर्भव्यावहारिक उदाहरणे देऊन रंजकपणे मांडले व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी ज्ञातीबांधव भगिनी वर्गाची चांगली उपस्थिती होती. उपाध्यक्ष श्री आनंद कुलकर्णी, महिला आघाडी समन्वयक सौ रेणुका ताई पेटारे आदींनी संयोजन केले. चंद्रशेखर पुरोहित यांनी आभार मानले.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे** ..........................................................................

*** सुखेंदु संजीव पिंगळे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** १४/०५/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ६.०६, **जन्म ठिकाण :** बुलढाणा, **उंची :** ५.७, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** कौन्दीण्य, **रास :** मीन, **नक्षत्र :** रेवती, **नाडी:** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी.एससी(आय टी), एम बी ए (आय टी), **नोकरी/ व्यवसाय :** स्वत:ची कंपनी, **वार्षिक उत्पन्न :** ३५/४०लाख जनतदवअमत, **अपेक्षा :** मुलाच्या व्यवसायास पूरक असल्यास प्राधान्य, **संपर्क:** ८१०८९२९०२६

*** शुभम मुकूंद कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** ०५/०१/१९९४, **जन्म वेळ :** सकाळी ९.५०, **जन्म ठिकाण :** अकोला, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** संख्ययन, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **नाडी:** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, इंटर सीए, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** ४लाख ६०हजार, स्वत:ला स्किनची ॲलर्जी आहे, **अपेक्षा :** सुसंस्कृत, अनुरूप, **संपर्क :** ८९७५५२८९३८/ ९९६०२५९५२८/९६८९६१८६०६

* **संकेत प्रमोद रांगणे (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २४/०२/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ७.५०, **जन्म ठिकाण :** मिरज, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** तुला, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.एससी, क्लाउड सेट. (आय आय टी)रूरकी, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** ८०लाख, **अपेक्षा :** अनुरूप, मुंबई, पुणे, सातारा, सांगलीला प्राधान्य, **संपर्क :** ९८२०१८१४४७/९८२०९१२०१८

* **बिंदूमाधव सुरेंद्र पुरोहित (देशस्थ कानडी माधवा ऋग्वेदी), जन्म तारीख :** १८/११/१९८५, **जन्म वेळ:** संध्याकाळी ७.१०, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** अत्री, **रास :** मकर, **नक्षत्र:** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** BMM, PGDM Fin CFA level I, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** १८लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९३७२०९६६८७

* **अमोल वामन तांबे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०३/१९७५, **जन्म वेळ :** सकाळी ८.११, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** गार्ग्य, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॉम, इंटर सीए, फायनल सीए शिकत आहे, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, वार्षिक उत्पन्न : १०लाख, **अपेक्षा :** अनुरूप, शाकाहारी, पदवीधर, **संपर्क :** ९८६७३६७३६७

* **राघवेंद्र गंगाधर देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्रा२ण), जन्म तारीख :** ०३/०५/१९९६, **जन्म वेळ :** रात्री १०.०८, **जन्म ठिकाण :** पंढरपूर, **उंची :** ६.३, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** तुला, **नक्षत्र:** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम बी ए, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** २लाख ६०हजार, **अपेक्षा :** मनमिळाऊ, उंची ५.४च्या पुढे, **संपर्क :** ९९७५८३४८३३/९६६५१६७३८७

* **अखिलेश अविनाश देसाई (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/१२/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ७.४०, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.८, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** जामदग्नी, **रास :** कर्क, **नक्षत्र :** अश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम, एम बी ए, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** ५लाख, **अपेक्षा :** पदवीधर, अनुरूप, शाकाहारी, **संपर्क :** ७७९८७३३६७४/९१७५९५५२२३

* **विनायक विवेकानंद कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १३/०४/१९९०, **जन्म वेळ:** रात्री ९.४४, **जन्म ठिकाण :** विटा सांगली, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** जामदग्नी, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** अनुराधा, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** ठम डमबीण, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न:** ब्रेक, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८७७९४६८३२८/९३२२५४२४६२

* **सौरभ श्रीकांत कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०३/१९८५, **जन्म वेळ :** रात्री ८.४०, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** वृषभ, **नक्षत्र:** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम बी ए इन फायनेंस मार्केटिंग, **नोकरी/ व्यवसाय :** Business Development Executive in Pune Mahabhringaraj Hair Oil Company, **वार्षिक उत्पन्न:** १०लाख, **अपेक्षा :** समंजस, पोटशाखा, शिक्षण, नोकरी, व्यवसाय व शहर याबाबत सविस्तर मांडावी, **संपर्क:** ८१०८९२९०२६

* **पराग सुधाकर गानु (कोकणस्थ चित्तपावन), जन्म तारीख :** १०/०७/१९९४, **जन्म वेळ :** दुपारी ३.२५, **जन्म ठिकाण :** धुळे, **उंची :** ६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** कर्क, **नक्षत्र :** पुष्य, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बीएसी. एग्रीकल्चर + एग्रीबिजनेस मॅनेजमेंट (पीजी), **नोकरी/ व्यवसाय :** एग्रीसर्च इंडिया प्रयावेट लिमिटेड नाशिक(मार्केटिंग डेव्हलपमेंट मॅनेजर), **वार्षिक उत्पन्न :** १५लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क:** ९१५८२७०७८९/६२६४८८०३२५

## वर पाहिजे ..............................................................

* **अपर्णा मोहन चितळे (कोकणस्थ), जन्म तारीख :** ११/०८/१९९७, **जन्म वेळ :** दुपारी २.१०, **जन्म ठिकाण:** बदलापूर, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** अत्री, **रास :** तुला, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.कॉम, सीएस शिकत आहे, **नोकरी/ व्यवसाय :** सीए फर्म नोकरी, **वार्षिक उत्पन्न:** ३०लाख, **अपेक्षा :** नोकरी, निर्व्यसनी, **संपर्क :** ९८६०९९६३६२/९८६०२९८३६७

* **श्रेया विजय वरूडकर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** ०९/११/१९९७, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.५६, **जन्म ठिकाण :** दादर, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (–), **गोत्र :** वसिष्ट, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** शततारका, **नाडी:** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम ए, बी एड, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** ३लाख, **अपेक्षा:** उच्चशिक्षित, **संपर्क :** ९८१९६५६१९३

* **पल्लवी संजय वळसंगकर (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** २९/०४/१९८८, **जन्म वेळ :** सकाळी २.२५, **जन्म ठिकाण :** चेबूंर (मुंबई), **उंची :** ५, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** मुद्‌गल, **रास :** कन्या, **नक्षत्र :** उत्तरा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** M.Sc in Business Analytics (UK), BE in instrumentation, **नोकरी/ व्यवसाय :** सध्या पार्ट टाईम जॉब यूके मधे करत आहे, **अपेक्षा :** अनुरूप, उच्चशिक्षित, **संपर्क :** ९८६७५०३३६८

* **गार्गी दिलीप कानिटकर (कोकणस्थ), जन्म तारीख :** ११/०१/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ५.२७, **जन्म ठिकाण :** बांद्रा मुंबई, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** मीन, **नक्षत्र :** पूर्व भाद्रपदा, **नाडी :** आद्य,, **गण :** देव, **शिक्षण :** बी कॉम, एमएमएस, आयआयटी डिप्लोमा, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** १३लाख, **अपेक्षा :** उच्च शिक्षित बोरिवली ते ठाणे, पुणे, बंगलोर स्थित, वेल सेटल्ड, **संपर्क:** ९८२१४५७०१६

* **भक्ती अशोक मांडके (देशस्थ ऋग्वेदी ब्रा२ण), जन्म तारीख :** ०८/०१/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ६.००, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** धनु, **नक्षत्र :** मूळ, **नाडी:** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम.एससी. (बायो टेक्नॉलॉजी सध्या वीआयटी युनिव्हर्सिटीला पीएचडी तामिळनाडू येथे करत आहे, **अपेक्षा :** निर्व्यसनी, मुंबई स्थित, स्वतःचे घर असावे, उच्च शिक्षित, **संपर्क :** ८६५७०८४४५४/ ९८९२९४९६५५/९८३३७५३१५९

* **सानिका वेदव्यास कट्टी (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख :** ०९/१२/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी १२.२१, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.५, **रक्तगट :** बी (–), **गोत्र :** वसिष्ट, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी:** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एमए संस्कृत एमए कथक जर्मन सी १ सर्टिफिकेट, **नोकरी/ व्यवसाय :** व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न :** ४लाख, **अपेक्षा :** ठाणे, मुंबई स्थित, उंची ५.८च्या पुढे, **संपर्क :** ९८२०४१४८२३/ ९८२०५६४७४०/९८२०८००२३९

* **डॉ. श्रुती दीपक कीर्तने (देशस्थ यजूर्वेदी), जन्म तारीख :** ११/१०/१९९६, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.५०, **जन्म ठिकाण :** दादर(मुंबई), **उंची :** ५.३, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडिल्य,, **रास :** कन्या, **नक्षत्र:** हस्त, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम बी बि एस, एम डी (निकाल अजून आला नाही), **नोकरी/ व्यवसाय:** स्टाइपेंड, **अपेक्षा : एम डी/एमएस/एमडीएस** १ते३ वर्ष वयात अंतर, **संपर्क :** ९८२०८३४१९०/ ९१६७०१५००३

* **ऋतुजा गीताआनंद गोडसे (देशस्थ यजूर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०३/०२/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ४.४०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.५, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** वत्स, **रास :** वृषभ, **नक्षत्र:**

मृग, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी एफ ए डिग्री फोटोग्राफी, **नोकरी/ व्यवसाय :** व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न :** १०लाख, **अपेक्षा :** मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे येथील स्थळास प्राधान्य, **संपर्क :** ९९८७५१८६४४/ ९९८७५१८६४५

**(घटस्फोटित / पुर्नविवाह)**

**वर पाहिजे** ..........................................................................................

*** जागृती विश्वास पाळंदे (चितपावन) (घटस्फोटित), जन्म तारीख :** २२/०३/१९९०, **जन्म वेळ :** रात्री १०.३२, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** मकर, **नक्षत्र:** श्रवण,नाडी : अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम.कॉम सीए फायनल, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न:** ५लाख, **अपेक्षा :** अनुरूप, निर्व्यसनी, शाकाहारी, **संपर्क :** ८८९८६३०६६८

*** डॉ. श्रुती प्रमोद मिसर (संध्या ब्रा२ण) (घटस्फोटित), जन्म तारीख :** १९/०८/१९८८, **जन्म वेळ :** सकाळी ९.१५, **जन्म ठिकाण :** अहमदनगर, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** तूळ, **नक्षत्र: स्वाती, नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** ठ।डैण च्ळक्ण म्डमैए **नोकरी/ व्यवसाय :** व्यवसाय, **वार्षिक उत्पन्न:** १०लाख, **अपेक्षा :** निर्व्यसनी, १२ वर्षाची मुलगी सांभाळणारा, **संपर्क :** ९८२१७९८१५४/ ९८२०७९२६७४

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध.**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**
**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.**
**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**



# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली
सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## खालील मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राघाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्ययावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्ययावत सोयीयुक्त सभागृह.

### * वैशिष्ट्ये *

वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन
मंगल कार्य ठरतात प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा.
सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम,
संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध

****

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadram@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com


SAMARTH
URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.
BEST SOCIETY AWARD WINNER

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.



**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याणच्या सभासद सौ.श्रुतिका कुलकर्णी/हरिदास यांनी योग विद्या गुरुकुल, नाशिक अंतर्गत योग विद्यापीठातून योग पंडित अभ्यासक्रम पूर्ण केला त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन**

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH